सत्यमेव जयते

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

barti

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

# बार्टीमार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांना महाराष्ट्र लोकसेवा आयोग - महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुलाखतीकरीता आर्थिक सहाय्य योजना

**बार्टी मार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीचे जे उमेदवार महाराष्ट्र लोकसेवा आयोग- महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०२३ उत्तीर्ण झाले आहे अशा उमेदवारांना मुलाखत चाचणी करीता एकरकमी आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात येणार आहे.**

- **योजनेचे स्वरूप:-**
  पात्र अनुसूचित जातीच्या उमेदवारांना एकरकमी रक्कम **रु.१०,०००/-** आर्थिक सहाय्य बार्टी मार्फत दिले जाईल.

- **पात्रता:-** १. उमेदवार महाराष्ट्रातील रहिवासी व अनुसूचित जातीचा असावा.
  २. उमेदवार दि.०३/०६/२०२४ रोजी जाहीर झालेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग - महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा -२०२३ उत्तीर्ण असावा.

- **अर्ज करण्यासाठी:-**
  १. उमेदवाराने खाली दिलेल्या लिंकवर (गुगल फॉर्म) जाऊन किंवा दिलेल्या QR कोड द्वारे दि. ३०/०६/२०२४ पूर्वी ऑनलाईन अर्ज भरावा. (ऑनलाईन अर्ज भरणे बंधनकारक आहे.)
  **https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSed9D7KxbwyZnERhWWZ1yRIgVOTHkkm6OOp1cQ3OB72ukxNww/viewform**
  २. संपूर्ण अर्ज व्यवस्थित व अचूक भरल्याची खात्री केल्यानंतरच उमेदवाराने अर्ज जमा (सबमिट) करावा.
  ३. अपूर्ण माहिती भरल्यास अथवा माहिती लपवल्यास, कोणत्याही टप्प्यावर सदर विद्यार्थ्यांची उमेदवारी बार्टी, पुणे मार्फत रद्द करण्यात येईल व आर्थिक सहाय्य ची संपूर्ण रक्कम वसूल करण्यात येईल.
  ४. एकाच विद्यार्थ्याने वेगवेगळी माहिती भरून एकापेक्षा जास्त वेळा अर्ज भरल्यास विद्यार्थ्यांची उमेदवारी बार्टी, पुणे मार्फत रद्द करण्यात येईल.
  ५. ऑनलाईन अर्जाव्यतिरिक्त उमेदवाराने सदर जाहिरातीसोबत जोडलेला अर्ज अचूक भरून अर्जासोबत खालील नमूद केलेल्या कागदपत्रांची स्व-साक्षांकित छायांकीत एक प्रत (हार्ड कॉपी) बार्टी, पुणे कार्यालयास पोस्ट/कुरियर द्वारा दि.०३/०७/२०२४ रोजी संध्या. ५ पर्यंत पाठवावी. **(कागदपत्राच्या पाकीटावर 'एम.पी.एस.सी - महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुलाखतीकरीता आर्थिक सहाय्य योजना' असे नमूद करावे.)**
     १. जातीचा दाखला/जात वैधता प्रमाणपत्र (कोणतेही एक)
     २. रहिवास दाखला (डोमासाईल प्रमाणपत्र)
     ३. एम.पी.एस.सी- महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा -२०२३ चे प्रवेश पत्र
     ४. आधार कार्ड
     ५. कोणत्याही राष्ट्रीयकृत बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत (बँक खाते फक्त अर्जदाराच्या नावानेच असावे. पालक/ नातेवाईक/ मित्र यांच्या बँक खात्याचा तपशील दिल्यास अर्जदाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल.)

- **सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी दोन्ही स्वरुपात (ऑनलाईन व ऑफलाईन) अर्ज करणे बंधनकारक आहे. केवळ ऑनलाईन अर्ज किंवा फक्त हार्ड कॉपी जमा केल्यास अर्ज ग्राह्य धारला जाणार नाही.**

**संपर्क -**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) २८, क्वीन्स गार्डन, कॅम्प पुणे - ४११००१**
**अधिक माहिती साठी ०२०-२६३३३३३०/२६३३३३३९ येथे संपर्क साधावा.**

(सुनिल वारे)
**महासंचालक,**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**